# स्वच्छतेचा मंत्र

## लेखिका : डॉ. सौ. सुधा कांकरिया

### प्रवेश पहिला

(घंटा वाजते. शाळेची मधली सुट्टी होते व मुले आंगणात येतात, काही जण डबा खाऊ लागतात. काही जण खेळायला लागतात कोणी झिम्मा, कोणी फुगडी तर कोणी लंगडी वगैरे खेळ खेळत आहेत. खेळता खेळता एक मुलगा चक्कर येऊन खाली पडतो, सगळेजण त्याच्याकडे धावतात. त्याला उचलून बेंचवर झोपवतात, कोणी वॉटरबॅग मधील पाणी काढून चेहऱ्यावर शिंपडतं तर कोणी पुस्तकाने हवा घालू लागतं, कोणी कपाळावर हात ठेऊन ताप पहातं, तर कोणी फोनवर त्यांच्या आई वडीलांशी बोलतय, कोणी धावत जाऊन वर्गशिक्षकांना बोलवतय)

शिक्षक : (प्रवेश करत) अरे राजू, काय झालं रे? पडला का? लागलं का? (कपाळावर हात ठेवत) अरे याला तर ताप आहे. राजू अरे राजू. . .

विद्यार्थी १ : सर, राजू खेळता खेळता पडला चक्कर येऊन पडला, तो काही बोलत नाही

विद्यार्थी २ : हालचालही करत नाही सर पाणी दिलं तर ते ही घेतलं नाही.

विद्यार्थी ३ : त्यांच्या आईवडिलांना फोन केला आहे ते येतीलच इतक्यात.
(आई वडील डॉक्टरकाकांना घेऊनच प्रवेश करतात.)
(आई धावतच राजूकडे जाते, त्याचे डोके मांडीवर घेते. डॉक्टर तपासू लागतात.)

आई (रडत) : काय झालं माझ्या राजूला? राजू, ए राजू बेटा डोळे उघड ना

बाबा : शांत व्हा पाहू, डॉक्टर तपासतील सगळं नीट होईल.

शिक्षक : हो ताई, शांत व्हा

विद्यार्थीनी १ : काकु तुम्ही पाणी घेता का? (वॉटरबॅगमधील पाणी ग्लासमध्ये देत)

डॉक्टर : नेमकं कसं झालं सांगा बरं मुलांनो

विद्यार्थी १ : सर, आम्ही खेळत होतो अन् खेळता खेळताच राजू चक्कर येऊन पडला.

डॉक्टर : ठिक आहे. राजूला ॲडमिट करावे लागेल. रक्त लघवी वगैरे तपासावी लागेल. काही काळजी करू नका बरा होईल तो.

आई बाबा : चला चला लवकर हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊयात. (२ वॉर्ड बॉय स्ट्रेचर घेऊन येतात स्ट्रेचरवरून राजूला हॉस्पिटलमध्ये नेले जाते. सोबत सगळे जातात)

### प्रवेश दुसरा

(राजू हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहे. तो कॉटवर झोपला आहे. डॉक्टरची तपासणी चालू आहे, तपासणी करत डॉक्टर केसपेपर वर रिपोर्ट लिहित आहेत. समोर बाबा व चार विद्यार्थी व शिक्षक उभे आहेत. आई राजूच्या उशाशी बसुन राजूचे डोके दाबत आहे.)

बाबा : डॉक्टर साहेब सगळे ठिक आहे ना?

डॉक्टर : हो हो, राजूचा तापही उतरला आहे व तो चांगला शुध्दीवरही आला आहे. पण त्याला आरामाची खुप आवश्यकता आहे.

आई : कशामुळे त्रास झाला माझ्या राजूला डॉक्टर साहेब? तो तर खुप हुशार आहे व परीक्षा ही जवळ आली आहे.परीक्षा तर बुडणार नाही ना?

डॉक्टर : आधी तो पूर्ण बरा होणे आवश्यक आहे. आत्ताच त्याला परीक्षेचा ताण देऊ नका

बाबा : नेमका कोणता रोग आहे हा?

डॉक्टर : डेंगू म्हणतात याला.

विद्यार्थी १ : म्हणजे डासामुळे होतो तो डेंगू का?

डॉक्टर : हो, होय

शिक्षक : डॉक्टर साहेब, आपणाला विनंती आहे की हा रोग टाळण्यासाठी काही प्रतिबंधक उपाय असेल तर सांगा ना?

बाबा : हो हो, आणि आपणाला वेळ नसेल तर त्याविषयीचे काही पुस्तक असेल तरी चालेल.

डॉक्टर : (पुस्तक देत) हे घ्या पुस्तक सर, मुले तुम्ही सगळे वाचा. खुप छान आहे हे पुस्तक.

Save Girl Child

विद्यार्थी १ : काय नांव आहे पुस्तकाचे?

डॉक्टर : स्वच्छतेचा मंत्र!

शिक्षक : आम्ही हे पुस्तक नक्की वाचू पण डॉक्टर साहेब आपण याल का शाळेत? माहिती देण्यासाठी

डॉक्टर : हं वेळ मिळणं जरा अवघड आहे पण, उदया माझी आकाशवाणीवर याच विषयावर मुलाखत आहे आपण जरूर ऐका. रात्री ८ वा. बरं का.

विद्यार्थी : (सगळे) हो हो आम्ही नक्की ऐकू. थँक्यू डॉक्टरकाका

## प्रवेश तिसरा

(आकाशवाणीचा स्टुडिओ आहे. तेथे मुलाकात घेणाऱ्या सुलभाताई व डॉक्टर साहेब दोघे बसले आहेत.)

सुलभाताई : रात्रीचे ठीक ८ वाजलेत आता आपण ऐकुया 'हॅलो डॉक्टर' कार्यक्रम – आज आपल्या स्टुडिओत आहेत सुप्रसिध्द डॉक्टर निशांत कुलकर्णी. नमस्कार डॉक्टर साहेब.

डॉक्टर : नमस्कार

सुलभाताई : आमच्या स्टुडिओमध्ये आपले स्वागत आहे. सध्या राज्यभर डेंग्युच्या साथीने थैमान घातलेले आहे. काय सांगाल या आजाराबद्दल कशामुळे होतो हा आजार?

डॉक्टर : डेंग्यूचा ताप हा एडीस् इजिप्ती या डासामुळे होतो. हा डास साठवलेल्या स्वच्छ पाण्यात वाढतो. कोणतेही साठवलेले पाणी सात दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवले गेले की या डासाचें जीवनचक्र पूर्ण होण्याला मदत होते.

सुलभाताई : बापरे, म्हणजे स्वच्छ पाण्यातही हा डास वाढतो का?

डॉक्टर : हो आणि या डासाला जीवनचक्र पूर्ण करण्यासाठी अगदी थोडया पाण्याची गरज असते. अगदी पाण्याच्या बाटलीच्या टोपणात साचलेल्या पाण्यातही तो वाढू शकतो.

सुलभाताई : यापासून आपला बचाव कसा केला पाहिजे?

डॉक्टर : वाया गेलेले टायर, कुलरमधील पाणी, छपरावर टाकलेले प्लास्टिक शीट, इतर ठिकाणी पडलेल्या अनेक निरूपयोगी वस्तू यामध्ये साठलेल्या पाण्यातही हा वाढतो. म्हणून एक दिवस कोरडा दिवस पाळायला हवा. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे स्वच्छतेचा मंत्र आचरणात आणला पाहिजे.

सुलभाताई : डेंग्यूच्या आजारावर काय औषध उपचार केले पाहिजेत?

डॉक्टर : अं हं, या विषाणूवर औषधच उपलब्ध नाही. त्यासाठी अजून लसही नाही, काही ठिकाणी या विषयी संशोधन चालू आहे. परंतू अजून तरी आपल्यासाठी ती उपलब्ध नाही यासाठी रामबाण उपाय म्हणजे सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता पाळणे.

सुलभाताई : श्रोते हो, लक्षात घ्या. या आजारावर केवळ एकच उपाय आहे आणि तो म्हणजे स्वच्छता, स्वच्छता आणि स्वच्छता. डॉक्टर साहेब आपण आमच्या स्टुडिओत आलात व उपयुक्त माहिती आम्हाला दिलीत त्याबद्दल सर्व श्रोत्यांच्या वतीने मी आपले मन:पूर्वक आभार मानते. नमस्कार मंडळी

Save Girl Child

## प्रवेश चवथा

वात्सल्याचे विद्यापीठ-आई

(राजूचे घर, बाबा पेपर वाचत आहेत, आई भाजी निवडत आहे, राजू कॉटवर झोपला आहे, त्यासोबत त्याचे मित्र आहेत, सगळेजण रेडिओ ऐकत आहेत)

लेखिका : डॉ. सौ. सुधा कांकरिया

आई : पहा किती छान माहिती सांगितली डॉक्टर साहेबांनी

बाबा : हो स्वच्छतेचा मंत्र पाळला पाहिजे.

विद्यार्थी १ : डॉक्टर काकांनी पुस्तक दिलय ना ते आपण वाचू या.

विद्यार्थी २ : हो आपण सगळेच वाचून ही माहिती प्रत्येकाला सांगूयात

बाबा : हे पहा मुलांनो, पेपरमध्ये काय बातमी आलीय ती?

राजू : काय आलीय बाबा?

बाबा : हे पहा मी वाचून दाखवतो.

– उघडयावर शौच करणारे भारतात सर्वाधिक, संयुक्त राष्ट्रसंघाचा अहवाल, उघडयावर जाणाऱ्यांची संख्या भारतात ५९७ दशलक्ष एवढी अफाट आहे.

– आपल्या देशाच्या एकुण लोकसंख्येच्या ४७% जनता उघडयावर शौच करते.
ऐकली बातमी
किती लाजिरवाणी बाब आहे ही

**आई** : महात्मा गांधीजी म्हणाले होते की स्वातंत्र्याहून स्वच्छता अधिक महत्वाची

**राजू** : हो आणि संत गाडगेबाबानी तर हातात झाडू घेऊन गावच्या गाव झाडून काढली होती, स्वच्छतेच महत्व पटवून दिले होते.

**विद्यार्थी १** : तरी आपली स्थिती ही अशीच!

**विद्यार्थी २** : आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी ही हातात झाडू घेतला. स्वच्छतेचा मंत्र जपला. वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी १२ हजार रूपयाचे अनुदान जाहीर केले.

**विद्यार्थी ३** : हो पंतप्रधान नरेंद्र मोदी सरांनी आपल्या विद्यार्थी मित्राशींही संवाद साधला प्रत्येक अंगणवाडी आणि शाळेतही शौचालय असलेच पाहिजे याविषयी ते आग्रही आहेत.

**आई** : घनकचरा व सांडपाण्याचेही व्यवस्थित व्यवस्थापन झाले पाहिजे. सार्वजनिक शौचालयाचीही व्यवस्था असली पाहिजे.

**राजू** : आता मी बरा झालो आहे हा स्वच्छतेचा मंत्र आपण सर्वांना देऊ या.

**सगळे** : स्वच्छतेचा मंत्र जपूया आपण सगळे निरोगी राहू या!

## प्रवेश पाचवा

(शिक्षक फळयावर 'स्वच्छतेचा मंत्र' लिहित आहेत. समोर विद्यार्थी-विद्यार्थीनी बसले आहेत. वर्गात काही ठिकाणी स्वच्छतेचे घोषवाक्य असलेले फलक लावलेले आहे.)

**शिक्षक** : आजचा विषय आहे स्वच्छतेचा मंत्र. चला पाहू सर्वजण नखे दाखवा. सर्वांनी नखे कापली आहेत का नाही? ती स्वच्छ आहेत का नाहीत. पाहिलं पाहिजे ना?
(शिक्षक फिरून सर्वांची हात व नखे पहातात)

**शिक्षक** : छान सर्वांचे हात स्वच्छ आहेत. नखे कापलेली आहेत. आणखी काय काय स्वच्छता पाळली पाहिजे बरं?
(अनेक विद्यार्थी हात वर करतात) हं तू सांग..

**विद्यार्थी १** : रोज आंघोळ केली पाहिजे. आपले अंग – कपडे – डोके – केस स्वच्छ ठेवले पाहिजे.

**विद्यार्थी २** : डबा खाण्यापूर्वी, जेवणापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुतले पाहिजे.

**विद्यार्थी ३** : शौचाला जाऊन आल्यावर हात साबणानी स्वच्छ धुतले पाहिजेत.

**विद्यार्थीनी १** : आपले घर – आंगण – परिसरही स्वच्छ असायला हवा.

**विद्यार्थीनी २** : सडा टाकुन रांगोळी काढणं आपली परंपरा आहे ती जपली पाहिजे.

**विद्यार्थीनी ३** : घरातला कचरा ओला कचरा कोरडा कचरा वेगवेगळा ठेऊन तो कचराकुंडीतच टाकला पहिजे.

**विद्यार्थी १** : पण गुरूजी, ती कचराकुंडी तुंबली तर?

**शिक्षक** : तर लगेच पालिकेला/महापालिकेला फोन करून सांगणे व ते काम आग्रहपूर्वक करून घेणे गरजेचे आहे. यात प्रशासनाचीही महत्वाची भुमिका आहेच.

**राजू** : मी बोलू का गुरूजी?

**शिक्षक** : हो बोल ना बोल बेटा!

**राजू** : आपल्या बाजूच्या अंगणवाडीला शौचालय नाही. माझे आई बाबा म्हणाले की आपल्या परिवाराच्या वतीने आपण त्यांना शौचालय बांधून देऊ या. (सगळेजण टाळया वाजवतात)

**शिक्षक** : छान छान, राजू, अभिनंदन बेटा. तुझं व तुझ्या आई बाबाचही! एवढं मोठ योगदान तुम्ही देण्याच ठरवलंय! अत्यंत पुण्याचे काम आहे हे बेटा! अभिनंदन! राजूच्या परिवारांनी ऐवढे महत्वाचे योगदान दिले आहे आपणही सर्वांनी आपापल्या परीने योगदान दिले पाहिजे.

**विद्यार्थीनी १** : मी घरातला कचरा, दप्तरातला कचरा बाहेर फेकणार नाही. फेकू देणार नाही.

**विद्यार्थी १** : मी बसमधून प्रवास करतांना कोणालाही कचरा टाकू देणार नाही केळीचे साल वगैरे कचराकुंडीतच गेले पाहिजे. सर्व प्रवाशांना त्याचे महत्व समजावून सांगेल.

**विद्यार्थीनी २** : माझ्या वाढदिवसाला मी बस स्टेशनसाठी ५ कचऱ्याकुंडया भेट देईन. (टाळया)

**विद्यार्थी २** : सार्वजनिक ठिकाणी म्हणजे बस स्टेशन, रेल्वे स्टेशन, रस्ते इथे कुठेही कचरा होऊ नये म्हणून आपण स्वच्छतेचे फलक लावू या सर, आपण स्वच्छतेविषयी रॅली काढूयात का?

**विद्यार्थी ३** : आणि निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वकतृत्व स्पर्धा ही घेता येईल.

**शिक्षक** : हो बरोबर आहे.

(सर्व विद्यार्थी व शिक्षक रॅली काढतात त्यांच्या हातात स्वच्छतेविषयी माहिती सांगणारे फलक आहेत व सर्वजण एका सुरात खालील घोषवाक्य म्हणत रॅलीमध्ये सहभागी होतात.)

: चला स्वच्छतेचा मंत्र जपू या
निरोगी आरोग्याचा आनंद लुटू या

: स्वच्छता हाच आमचा देव आहे.
आरोग्यसंपन्नतेची हीच मोठी ठेव आहे.

: स्वच्छता हा दागिना खरा
रोगापासून दूर रहा

: संत गाडगेबाबाचा विजय असो
स्वच्छता मंत्राचा जयजयकार असो

: स्वराज्यापेक्षाही स्वच्छता महत्वाची असते
आरोग्य आणि आनंद देणारी ती एक कामधेनू असते

**शिक्षक** : चला मित्रांनो आपण सर्व सामुहिक शपथ घेऊयात.

**शपथ**

भारत माझा देश आहे
सारे भारतीय माझे बांधव आहेत
माझा भारत देश स्वच्छ व आरोग्यसंपन्न असावा
असे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे
हे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी
आम्ही वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे
पालन करण्याविषयीची शपथ घेत आहोत
आपले घर-आंगण-परिसर, गांव-तालुका-जिल्हा
राज्य-देश-परदेश, स्वच्छ-स्वस्थ-सुंदर
राहण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू
अशी शपथ आम्ही सर्वांच्या साक्षीने घेत आहोत
भारत माता की जय!
वंदे मातरम्!

Save Girl Child